मराठी


# बालभारती

इयत्ता पहिली



CYAN MAGENTA YELLOW BLACK

शासन मंजुरी क्रमांक : प्राशिसं/२०१३-१४/७४७२/मंजुरी/ड-५०५/२३४३ दिनांक : २०/५/२०१३



## मराठी

# बालभारती

## इयत्ता पहिली

२०१३
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

प्रथमावृत्ती : २०१३

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा समिती :**
डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, अध्यक्ष

**सदस्य :**
प्रा. रा. रं. बोराडे
इरगोंडा पाटील
फादर फ्रान्सिस दिब्रिटो
वाहरू सोनवणे
प्रा. प्रज्ञा दया पवार
अतुल कुलकर्णी
डॉ. सुभाष सावरकर
किशोर दरक

**सदस्य–सचिव :**
माधव राजगुरू

**मराठी भाषा समिती – कार्यगट सदस्य**

हरी गंगाधर नारलावार
प्रा. सर्जेराव रणखांब
श्रीमती रेणू दांडेकर
प्रा.जयवंत पाटील
डॉ. रोहिणी गायकवाड
डॉ. मंदा नांदूरकर
प्रा. डॉ. सिसिलीया कार्व्हालो
प्रा. डॉ. सुनीता सुळेकर
डॉ. संध्या पवार
श्रीकांत चौगुले
पद्माकर कुलकर्णी
शिवा कांबळे
नीलेश निमकर
एकनाथ आव्हाड
अतुल कुलकर्णी
वेच्या रूध्या गावित

| | | |
|---|---|---|
| **संयोजन** | : | माधव राजगुरू, विशेषाधिकारी, मराठी |
| | : | श्रीमती उषादेवी प्रताप देशमुख, विषय सहायक, मराठी |
| **चित्रकार** | : | घनश्याम देशमुख |
| **मुखपृष्ठ** | : | स्नेहल पागे |
| **अक्षरजुळणी** | : | भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे. |
| **निर्मिती** | : | सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी<br>सुनील कसबेकर, निर्मिती अधिकारी<br>नितीन वाणी, निर्मिती सहायक |
| **कागद** | : | ७० जी.एस.एम. क्रीमवोव्ह |
| **मुद्रणादेश** | : | |
| **मुद्रक** | : | |

**प्रकाशक**
**विवेक उत्तम गोसावी**
नियंत्रक,
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक,** भारताचे एक **सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत.**

# राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्‌ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्‌धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९' आणि 'राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा - २००५' डोळ्यांसमोर ठेवून राज्यात 'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - २०१२' तयार करण्यात आला. या शासनमान्य अभ्यासक्रमावर आधारित मराठी विषयाची इयत्ता पहिली ते आठवीची नवीन बालभारती माला २०१३-१४ या शालेय वर्षापासून टप्प्याटप्प्याने पाठ्यपुस्तक मंडळ प्रकाशित करत आहे. या मालेतील हे पहिल्या इयत्तेचे पुस्तक आपल्या हाती देताना आम्हांला विशेष आनंद वाटतो.

इयत्ता पहिलीचा वर्ग हा प्राथमिक शिक्षण स्तरावरील पहिला टप्पा आहे. ऐकलेले समजणे, स्वतः बोलणे या अनौपचारिक भाषाशिक्षणाची सुरुवात मुलांच्या घर व परिसरात झालेली असते. मूल शाळेत आल्यानंतर त्याच्या औपचारिक भाषाशिक्षणाला सुरुवात होते.

पहिल्या इयत्तेतील लहान वयाच्या मुलांचे शिकणे सुलभ व्हावे म्हणून हे पुस्तक अधिक चित्ररूप, कृतिप्रधान आणि बालस्नेही राहील याची काळजी घेतली आहे. या वयोगटाच्या मुलांची नैसर्गिक आवड लक्षात घेऊन त्यांचे भाषाशिक्षण रंजक आणि आनंददायी होण्यासाठी मुलांना सहज गुणगुणता येतील अशी गाणी, कविता, चित्रकथा आणि रंगीत चित्रे यांचा पाठ्यपुस्तकात वापर केलेला आहे.

परिसर अभ्यासाचे अनेक घटक या पुस्तकात एकात्मिक पद्धतीने समाविष्ट केले आहेत. शिक्षकांनी हे घटक शिकवताना ज्ञान शाळेबाहेरील जगाशी व दैनंदिन जीवनव्यवहाराशी जोडले जाईल, अशा अध्ययन-अनुभवांची जोड द्यावी.

शिक्षक आणि पालक यांच्या मार्गदर्शनार्थ 'हितगुज'मध्ये पाठ्यपुस्तक निर्मितीमागची भूमिका विशद केली असून प्रत्येक पाठाच्या अनुषंगाने आवश्यक सूचना त्या त्या पृष्ठावर दिल्या आहेत. वर्गातील अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया योग्य दिशेने घडून येण्यासाठी या सूचना उपयोगी पडतील, अशी अपेक्षा आहे.

मराठी भाषा समिती, कार्यगट सदस्य आणि चित्रकार यांच्या आस्थापूर्वक परिश्रमांतून हे पुस्तक तयार झाले आहे. हे पुस्तक जास्तीत जास्त निर्दोष आणि दर्जेदार व्हावे, यासाठी राज्याच्या विविध भागांतील प्राथमिक शिक्षक व तज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करून घेण्यात आले आहे. समीक्षकांच्या सूचना व अभिप्राय यांचा विचार करून मराठी भाषा समितीने पुस्तकाला अंतिम स्वरूप दिले आहे.

मराठी समिती आणि संबंधित समीक्षक, तज्ज्ञ, चित्रकार या सर्वांचे मंडळ मनःपूर्वक आभारी आहे. विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील अशी आशा आहे.

**(गंगाधर म्हमाणे)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक** : १३ मे २०१३
२३ वैशाख, शके १९३५

# हितगुज

मूल शाळेत येण्यापूर्वी घर आणि परिसरात पाहून, ऐकून भाषा बोलायला शिकत असतं. मोठी माणसं त्याला शिकायला मदत करत असतात. हे त्या मुलाचं अनौपचारिक भाषाशिक्षणच असतं. आई-वडिलांचं बोट धरून मूल शाळेत दाखल झालं, की त्याचं श्रवण, भाषण-संभाषण, आणि वाचन-लेखनादी औपचारिक भाषाशिक्षण सुरू होतं. त्याच्या भाषाशिक्षणातील गती ही शाळेत मिळणाऱ्या पर्यावरणावर अवलंबून असते. शाळेत घरासारखं मुक्त वातावरण असावं; गुरुजी, बाई, बरोबरीची मुले यांच्याशी मोकळेपणाने बोलता यावं, प्रश्न विचारता यावेत, मुलाला स्वतःला येतं ते इतरांना शिकवता यावं, नीटनेटकं लिहिता यावं, वाचता यावं, त्याच्यावर चांगले संस्कार व्हावेत असं शाळेत जाणाऱ्या प्रत्येक पाल्याच्या पालकाला वाटत असतं. याच अपेक्षा राज्य व राष्ट्रीय स्तरावर एन.सी.एफ.-२००५, शिक्षण हक्क कायदा-२००९, एस.सी.एफ.-२०१० मध्ये व्यक्त केल्या आहेत. या अपेक्षांची पूर्तता करण्याची बांधीलकी स्वीकारून मराठी समितीने प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम-२०१२ वर आधारित पहिलीचे पाठ्यपुस्तक तयार केले आहे.


शिक्षणव्यवस्थेत पाठ्यपुस्तकांबरोबरच सुलभक म्हणून शिक्षकांची भूमिका फार महत्त्वाची असते. शिकवण्यापेक्षा बालकांना स्वतः शिकण्यास मदत होईल, असे पोषक वातावरण निर्माण करून त्यांना शिकू दिलं पाहिजे. मूल स्वतःच्या अनुभवातून प्रत्येक गोष्टीचा अन्वयार्थ लावत लावत स्वतःच शिकत असतं. शाळेत मिळालेलं ज्ञान शाळेबाहेरील जगाशी, दैनंदिन जीवन-व्यवहाराशी जोडता आलं पाहिजे, यासाठी मूल अडेल तिथे त्याला साह्य करणे हीच सुलभकाची भूमिका शिक्षकांनी पार पाडावी.

पहिलीतील मूल पहिल्यांदाच वाचायला, लिहायला शिकणार असतं. हे शिकणं सुलभ आणि दडपणमुक्त व्हावं, याची काळजी या पुस्तकात घेतली आहे. या टप्प्यावर भाषाशिक्षण महत्त्वाचे असल्यामुळे माहिती वा आशयापेक्षा भाषिक कौशल्ये शिकण्यावर भर दिला आहे. विद्यार्थी स्वयं ज्ञानाचे निर्माते असतात. आशयातून मिळालेल्या माहितीच्या आधारे अध्ययन प्रक्रियेद्वारे ते ज्ञानाची निर्मिती करतात. ही ज्ञानरचनावादाची संकल्पना मुळाशी ठेवून संपूर्ण पुस्तकात कृती, प्रात्यक्षिक, उपक्रम, भाषिक खेळ व कोडी यांवर आधारित अध्ययन-अनुभवांची योजना केली आहे. मुलांच्या अभिव्यक्तीला मुक्त संधी देताना त्यांच्या बोली भाषेतील शब्दांचा स्वीकार करावा, असे धोरण अवलंबले आहे. मुलांच्या भावविश्वातील विषयांवर आधारित प्रसंगचित्र, वाचनाची गोडी लावणारा रोचक, रंजक आणि लयबद्ध मजकूर, मुलांची अभिव्यक्ती या पार्श्वभूमीवर दृक्‌शब्दांच्या मदतीने होणारी वाक्ये यांचे वाचन, दृक्‌शब्दांतील सुरुवातीस व शेवटी येणाऱ्या अक्षरांचा परिचय, त्याद्वारे नवीन शब्दपरिचय, अक्षरांशी/शब्दांशी खेळत वाक्यवाचन व लेखन अशी पाठ्यपुस्तकाची मांडणी केली आहे. स्वयंलेखनासाठी चढत्या क्रमाने पाठयोजना केली आहे. श्रवण, भाषण-संभाषण, वाचन व लेखन या भाषिक कौशल्यांचा एकात्मपणे विकास करण्यास शिक्षकांना मार्गदर्शक ठरणाऱ्या तळटिपा पुस्तकात जागोजागी दिल्या आहेत. पाठांमध्ये जीवनकौशल्ये, गाभाघटक आणि मूल्ये यांचाही समावेश केला आहे, त्यामुळे या पुस्तकातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडू शकेल, असा मराठी समितीला विश्वास वाटतो.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पाठाचे नाव | पृ.क्र. | अ.क्र. | पाठाचे नाव | पृ.क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | आला पाऊस आला (गाणे) - शांता शेळके | १ | २२. | मी कोण ? | ४० |
| | ढोंड, ढोंड पानी दे (गाणे) - लोकगीत | २ | २३. | माझा शब्दसंग्रह-५ | ४२ |
| २. | जिंकलं कोण ? (चित्रमालिका) | ३ | २४. | ऊठ मुला ! (कविता) - बालकवी | ४७ |
| ३. | मी आणि माझे मित्र | ४ | २५. | माझा शब्दसंग्रह-६ | ४८ |
| ४. | आपला परिसर | ५ | २६. | पीक येई भरदार (कविता) | ५४ |
| ५. | कुटुंब माझे छान ! | ६ | २७. | माझा शब्दसंग्रह-७ | ५५ |
| ६. | कोल्ह्याला द्राक्षे...(चित्रमालिका) | ८ | २८. | माझा शब्दसंग्रह-८ | ५९ |
| ७. | भिंग भिंग भिंगरी (गाणे)-कमला पवार | ९ | २९. | ओळखा पाहू (भाषिक खेळ) | ६२ |
| ८. | आमची खेळणी | १० | ३०. | कोठे, काय ? | ६३ |
| ९. | पाहुणा ओळखा बरे ! | १२ | ३१. | माझा शब्दसंग्रह-९ | ६४ |
| १०. | गिरवा. रंग भरा. | १३ | ३२. | मुळाक्षरे | ६६ |
| ११. | प्राण्यांच्या गमतीजमती | १५ | ३३. | नवा खेळ | ६७ |
| १२. | माझा शब्दसंग्रह-१ | १७ | ३४. | माझे घर | ६८ |
| १३. | माझा शब्दसंग्रह-२ | २० | ३५. | आपले सण-उत्सव | ६९ |
| १४. | उघड्यावरचा खाऊ (कविता) | २४ | ३६. | रमिलाची सावली | ७० |
| १५. | माझा शब्दसंग्रह-३ | २५ | ३७. | कसे मिळेल पाणी ? | ७१ |
| १६. | बाळाचे दोस्त (गाणे) | २८ | ३८. | आपले बापूजी | ७३ |
| १७. | झुईं झुईं झोका (गाणे) - हेमंत मुसरीफ | ३१ | ३९. | फुलसिंग आणि इवलेसे रोप | ७४ |
| १८. | खेळ रंगला | ३३ | ४०. | गोष्ट एका घोड्याची | ७६ |
| १९. | खेळूया शब्दांशी | ३५ | ४१. | झाली सकाळ...(कविता) | ७८ |
| २०. | चला सहलीला | ३६ | | -विठ्ठल वाघ | |
| २१. | माझा शब्दसंग्रह-४ | ३७ | ४२. | माझी ओळख | ८० |

# १. आला पाऊस आला



- ऐका. म्हणा. पाहा. बोला.

पाऊस पडतो, सर सर सर
घरी चला रे, भर भर भर !

पाऊस वाजे, धडाड् धूम
धावा, धावा ठोका धूम !

धावता, धावता गाठले घर
पड रे पावसा दिवसभर !

पड रे पावसा, चिडून चिडून
आईच्या कुशीत, बसलो दडून !

– शांता शेळके



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून पुढील कृती करून घ्याव्यात. १. गाणे ऐकून तालासुरात, साभिनय म्हणणे. (समूहात, गटात, वैयक्तिक) २. चित्राचे वर्णन करणे. ३. पाहिलेला निसर्ग, पाऊस, पक्षी यांचे वर्णन करणे. ४. स्वतःच्या बोली भाषेतील गाणे म्हणणे. उदाहरणादाखल बोली भाषेतील एक गाणे पुढील पृष्ठावर दिले आहे.

**टीप :** पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठात भाषिक आंतरक्रिया घडवून आणताना विद्यार्थ्यांना त्यांच्या बोली भाषेत व्यक्त होऊ द्यावे. त्यांची बोली भाषा स्वीकारावी.

- ऐका. म्हणा.

## ढोंड, ढोंड पानी दे


ढोंड, ढोंड पानी दे,
साय-माय पिकू दे !

पंडायमां कवडी,
यरं पानी दौडी.

ढोंड, ढोंड पानी दे,
साय-माय पिकू दे !

किसन गया खेतमां,
पानी वूना रातमां.

ढोंड, ढोंड पानी दे,
साय-माय पिकू दे !



**शिक्षकांसाठी :** आदिवासी भिलोरी बोली भाषेमध्ये 'ढोंड, ढोंड पानी दे' असे म्हणतात. काही भागांमध्ये 'धोंडी, धोंडी पानी दे'असेही म्हणतात. आदिवासी बोली भाषेतील शब्दांचे अर्थ सांगावेत. जसे : **पानी**-पाऊस-पाणी, **साय**-साळी, **पंडाय**-पन्हळ, **यरं**-येरे, **वूना**-आला.

# २. जिंकलं कोण ?

- **पाहा. बोला.**







**शिक्षकांसाठी :** १. विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. प्रत्येक चित्रात काय काय दिसते ते विचारावे. २. ससा व कासव का पळत असतील, ससा नदीजवळ का थांबला असेल, ससा व कासव आपसात काय बोलत असतील, कासवाने सशाला नदीबाहेर पाठीवरून का नेले असावे, नदीबाहेर पडल्यानंतर पुढे काय झाले असेल, रिकाम्या चौकटीत कोणते चित्र येईल इत्यादी प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना बोलते करावे. ३. चित्र व चर्चा यांवरून मुलांना गोष्ट सांगण्यास प्रोत्साहन द्यावे. नंतर स्वतः गोष्ट सांगावी. ४. ससा व कासवाची पारंपरिक गोष्ट विद्यार्थ्यांना माहीत असल्यास ती सांगण्यास सुचवावे. स्वतः पारंपरिक गोष्ट सांगावी. ५. ही गोष्ट व पारंपरिक गोष्ट यांची तुलना करण्यास विद्यार्थ्यांना सांगावे.

# ३. मी आणि माझे मित्र


- **पाहा. ऐका. बोला.**




**शिक्षकांसाठी :** १. या पृष्ठावरील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांतील नावे वाचून दाखवावी. कोण, काय करत आहे ते विचारावे. २. वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याची नामपट्टी तयार करावी. त्या त्या विद्यार्थ्याला दाखवून वाचावी. विद्यार्थ्यांकडून वदवून घ्यावी. नंतर ती त्याच्याकडे द्यावी. शाळा सुटण्याच्या वेळी सर्वांच्या नामपट्ट्या एकत्र करून ठेवाव्या. ही कृती साधारणतः एक आठवडा चालू ठेवावी. ३. दुसऱ्या आठवड्यात स्वतःची नामपट्टी घेऊन वाचण्याचा सराव घ्यावा. इतर विद्यार्थ्यांच्या नामपट्ट्या ओळखण्याचा सराव घ्यावा. ४. स्वतःच्या नामपट्टीवर चित्रातील कृती क्रमाक्रमाने घरी करण्यास सांगावे. ५. विद्यार्थ्यांकडून स्वतःची नामपट्टी तयार करवून वर्गात प्रदर्शन भरवावे व त्यांचे वाचन घ्यावे.

# ४. आपला परिसर

- **पाहा. बोला.**





**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना एकेका चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. 'प्रत्येक चित्रात कोणकोण आहेत? काय करत आहेत? ते काय बोलत असतील?' असे प्रश्न विचारून त्यांना बोलते करावे. चित्रातील प्रसंग, संभाषण यांबद्दल अधिक माहिती सांगावी. अशा प्रसंगांशी संबंधित विद्यार्थ्यांचे अनुभव विचारावेत. विविध प्रसंगचित्रे दाखवून त्यांना बोलते करावे.

# ५. कुटुंब माझे छान !

• पाहा. बोला.



शिक्षकांसाठी : १. 'तुमच्या घरी कोणकोण राहतात, कोणकोणती कामे करतात, तुम्ही त्यांच्या कोणकोणत्या कामांत मदत करता, कोणती मदत करता' असे प्रश्न विचारावेत. २. एका मुलीच्या कुटुंबातील व्यक्तींची नाती व त्यांची नावे फलकावर लिहावीत. ती वाचून दाखवावीत. विद्यार्थ्यांकडून वदवून घ्यावीत. (विद्यार्थ्यांनी बोली भाषेत सांगितलेले नातेवाचक शब्द स्वीकारून त्यांना अधिक बोलते करावे.) ३. विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रातील अभयच्या कुटुंबाची माहिती सांगावी. चित्रातील मुलाचे नाव, कुटुंबातील व्यक्तीचे मुलाशी असलेले नाते व त्यांची नावे सांगावीत. ४. विद्यार्थ्यांना पुढील पृष्ठावरील एकेक वाक्य वाचून दाखवावे. स्वतःबरोबर म्हणण्यास सांगावे. ही वाक्ये गटात वाचण्याचा सराव घ्यावा.

- पाहा. ऐका. म्हणा.

मी अभय.



हे माझे घर.



ही माझी आई.



ही माझी ताई.



हे माझे बाबा.



ही माझी आजी.




हे माझे आजोबा.



ही माझी मामी.



हे माझे मामा.



हे आमचे घड्याळ.



- शब्द-शब्द जोड्या जुळवा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| आई | ताई | बाबा | अभय | आजी |
| बाबा | आई | अभय | आजी | ताई |

शिक्षकांसाठी : १. चित्र-शब्दकार्डे (फ्लॅशकार्डे) वापरून एका दृष्टिक्षेपात शब्द वाचण्याचा सराव घ्यावा.

# ६. कोल्ह्याला द्राक्षे...

- **पाहा. बोला.**

१



२




३

४



**शिक्षकांसाठी :** चित्रांचे निरीक्षण करणे, चित्रांत कोण, काय करत आहेत ते ओळखणे, चित्रांचा क्रम ठरवणे, गाळलेल्या जागी कोणते चित्र असावे यासंबंधी कल्पना करणे, गोष्ट सांगणे यांसारख्या कृती प्रथम गटात करून घ्याव्यात. गाळलेल्या जागी येणाऱ्या चित्राबद्दल मुले वेगवेगळ्या कल्पना मांडतात, त्या सर्वांसमोर सांगण्यास प्रोत्साहन द्यावे. हा विचार कसा सुचला याबद्दल चर्चा करावी. या गोष्टीची मूळ पारंपरिक गोष्ट विद्यार्थ्यांना माहीत आहे का ते विचारावे. माहीत असल्यास ती सांगण्यास सुचवावे. नसल्यास शिक्षकांनी स्वतः पारंपरिक (कोल्ह्याला द्राक्षे आंबट) गोष्ट सांगावी. शेवटी वरील गोष्टीला शीर्षक देण्यास सांगावे.

# ७. भिंग भिंग भिंगरी



- ऐका. म्हणा.

एक होती भिंगरी
भिंग भिंग भिंगरी,
तिचं नाव झिंगरी
झिंग झिंग झिंगरी ॥ १ ॥

तिला आहे
एक पाय,
पायावरती
गिरकी खाय ॥ २ ॥

सारखी सारखी
फिरते गोल,
फिरता फिरता
जातो तोल ॥ ३ ॥

गिरकी खाऊन
आली चक्कर,
भिंतीवरती
मारली टक्कर ॥ ४ ॥

**– कमला पवार**


शिक्षकांसाठी : गाणे तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावे. नंतर विद्यार्थ्यांना गाणे तालासुरात, साभिनय म्हणायला सांगावे. गाणे म्हणण्याचा गटात, समूहात, वैयक्तिक सराव घ्यावा. भिंगरी – झिंगरी, चक्कर – टक्कर, फिरता फिरता, सारखी सारखी यांसारख्या शब्दांकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधावे. अशा शब्दांची उदाहरणे देण्यास प्रोत्साहन द्यावे व बोलण्यात त्यांचा वापर करण्यास सांगावे. चित्राचे वर्णन करायला सांगावे.

# ८. आमची खेळणी

- पाहा. बोला. ऐका. म्हणा.

खेळणी आमची मातीची.
रंगीबेरंगी कागदांची.
विमान बनवले दीपाने.
मोटार बनवली जॉनने.
चेंडू आणला अजयने.
भोवरा आणला उषाने.
ताईच्या हाती बाहुली बघा.
हवेत उडतो लाल लाल फुगा.














शिक्षकांसाठी : तुमच्याकडे कोणकोणती खेळणी आहेत, तुम्हांला कोणते खेळणे आवडते, का आवडते, तुम्ही खेळणे कसे सांभाळता, इतरांना खेळणे देता का, स्वतः खेळणी बनवता का, हे विचारून विद्यार्थ्यांनी सांगितलेल्या खेळण्यांची नावे फलकावर लिहावीत. ती वाचावी. मुलांना म्हणायला सांगावे. नंतर या पृष्ठावरील चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. गाणे ऐकून म्हणण्यास सांगावे. त्यातील खेळण्यांची नावे विचारावीत. विद्यार्थ्यांनी सांगितलेली वाक्ये फलकावर लिहून, वाचून दाखवावीत.


उपक्रम : विद्यार्थ्यांच्या खेळण्यांचे प्रदर्शन वर्गात भरवावे. खेळणी हाताळण्याची व खेळण्यांबद्दल बोलण्याची संधी द्यावी. येथील अनुभव घरी सांगण्याबद्दल सूचना द्यावी.

- पाहा. ऐका. म्हणा.



बाहुली


विमान


भिंगरी


भोवरा


मोटार


फुगा

---


- शब्द-शब्द जोड्या जुळवा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| फुगा | विमान | बाहुली | मोटार | भिंगरी | भोवरा |
| बाहुली | भिंगरी | फुगा | विमान | भोवरा | मोटार |

**शिक्षकांसाठी :** चित्र-शब्द, शब्द-शब्दकार्डे वापरून एका दृष्टिक्षेपात शब्द वाचण्याचा सराव घ्यावा.

# ९. पाहुणा ओळखा बरे !

- पाहुणा ओळखा. ✓ अशी खूण करा.



- ऐका. शब्दातील शेवटचा उच्चार लक्षात ठेवा. पाहुणा ओळखा.


| | | | | |
|---|---|---|---|---|
| बाग | माग | बघ | साग | राग |


- ऐका. शब्दातील सुरुवातीचा उच्चार लक्षात ठेवा. पाहुणा ओळखा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| माई | मासा | आई | मामा | माय |


**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना प्रत्येक गटाचे निरीक्षण करायला सांगावे. गटात न बसणारा वेगळा पाहुणा कोण ते ओळखायला सांगावे. पाहुणा कसा ओळखला ते विचारावे. निरीक्षणासाठी विद्यार्थ्यांच्या गटात असे वेगवेगळ्या शब्दांचे, आकृत्यांचे, चिन्हांचे गट द्यावेत.

# १०. गिरवा. रंग भरा.






- गिरवा. रंग भरा.



# ११. प्राण्यांच्या गमतीजमती


- पाहा. बोला. ऐका. म्हणा.

हत्ती चालतो झुलवत सोंड,
माकडाने रंगवले आपले तोंड.
गाढवाच्या पाठीवर ओझे फार,
वानरही झाले त्यावर स्वार.
वाघ येताच हरिण घाबरले,
कुत्र्याने सारे रान उठवले.
मासा, कासव पाण्यात लपले,
ससा नि गाय पळत सुटले.




**शिक्षकांसाठी :** प्राण्यांचे मुखवटे विद्यार्थ्यांना द्यावेत किंवा त्या प्राण्यांच्या भूमिका द्याव्यात. भूमिकेप्रमाणे प्राण्यांची नक्कल करण्यास सांगावे. (जसे- प्राण्यांच्या हालचाली करणे, आवाज काढणे.) त्या प्राण्यांबद्दल बोलण्यास सांगावे. विद्यार्थ्यांना माहीत असलेल्या प्राण्यांची नावे विचारावीत. ती फलकावर लिहून तसेच शब्दपट्ट्या तयार करून वाचण्याचा सराव घ्यावा. नंतर विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करायला सांगून लगेच त्यासोबतचा मजकूर लयीत वाचून दाखवावा. विद्यार्थ्यांनाही सोबत म्हणायला सांगावे. नंतर चित्रांची नावे विचारावीत. वर्गातील नकलांचे अनुभव घरी व मित्रांना सांगण्यास सांगावे.

- पाहा. ऐका. म्हणा.



कुत्रा  मासा  कासव  गाढव  वानर



ससा  हत्ती  माकड  गाय  हरिण  वाघ

- जोड्या जुळवा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कासव | गाढव | ससा | हत्ती | वानर |
| ससा | कासव | वानर | हत्ती | गाढव |

- जोड्या जुळवा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| हरिण | वाघ | कुत्रा | माकड | मासा | गाय |
| कुत्रा | माकड | हरिण | मासा | गाय | वाघ |

**शिक्षकांसाठी :** चित्रकार्डे, शब्दकार्डे वापरून एका दृष्टिक्षेपात शब्द वाचण्याचा सराव घ्यावा.

# १२. माझा शब्दसंग्रह-१

- शब्द वाचा. सारखे अक्षर ओळखा. वाचा.




**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना फुग्यांवरील शब्द पाहण्यास सांगावे. शब्द वाचून दाखवावे. म्हणण्यास सांगावे. पृ. १७ व १८ वरील सारख्या अक्षराने सुरुवात व शेवट होणारे शब्दगट पाहण्यास सांगून समान अक्षरे ओळखण्यास सांगावे. ती अक्षरे वाचून दाखवावी. म्हणण्यास सांगावी. या पद्धतीने अक्षरे वाचण्याचा सराव घ्यावा. त्यानंतर शब्दपट्ट्या देऊन त्या शब्दांत ही अक्षरे शोधण्याचा गटात सराव घ्यावा.

• शब्द वाचा. सारखे अक्षर ओळखा. वाचा.




वा य र ह सा मा

- पाहा. ऐका. समजून घ्या. वाचा. लिहा.

| | | |
|---|---|---|
| मा | म | ा |
| वा | व | ा |


| | | |
|---|---|---|
| बा | ब | ा |
| गा | ग | ा |

| | | |
|---|---|---|
| या | य | ा |
| सा | स | ा |

| | | |
|---|---|---|
| घ | ा | घा |
| स | ा | सा |

| | | |
|---|---|---|
| र | ा | रा |
| ह | ा | हा |

- खालील अक्षरे जुळवा. शब्द, वाक्य बनवा.




**जसे :** घार

घार बघ. आई, घार बघ.

- वाचा. लिहा.

| | | |
|---|---|---|
| माई, बस. | बघ. | बघ. |
| बाई, या. | मासा बघ. | माई, बघ. |
| बाई, बसा. | माई, मासा बघ. | माई, मासा बघ. |


शिक्षकांसाठी : 'ा' हे चिन्ह वेगळे करून सारणीत दिलेली अक्षरे वाचून दाखवावी. 'मा', 'म' यांचा उच्चार लागोपाठ करावा. उच्चारांतील फरक विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावा. परिचित झालेल्या अक्षरांना 'ा' जोडून वाचून दाखवावे. नव्याने परिचित झालेली अक्षरे व पूर्वीची अक्षरे यांपासून तयार झालेले शब्द, वाक्ये वाचून घ्यावी. अक्षरकार्डांच्या साहाय्याने गटात शब्द बनवण्याचा सराव घ्यावा. विद्यार्थ्यांनी तयार केलेले शब्द फलकावर लिहून ते वाचण्याचा सराव घ्यावा.

# १३. माझा शब्दसंग्रह-२

● पाहा. ऐका. म्हणा.




ताटात घेतली भाजी-भाकरी ।
चवीला चटणी, कांदा नि कैरी ।।
आवडीने खाल्ली भाजी-भाकरी ।
ताक-भाताची मजाच न्यारी ।।



शिक्षकांसाठी : १. 'रोजच्या जेवणात कोणकोणते पदार्थ असतात किंवा तुमच्या जेवणात काय काय असते?' असा प्रश्न विचारावा. मुलांनी सांगितलेल्या पदार्थांची नावे फलकावर लिहावीत. काही पदार्थांची नावे बोली भाषेत असल्यास (उदा., कोरड्यास, कालवण, इत्यादी) जशीच्या तशी लिहावीत. ती वाचून दाखवावीत. विद्यार्थ्यांना म्हणण्यास सांगावे. २. नंतर या पृष्ठावरील चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे. चित्राशी संबंधित शब्द विचारावेत. ते फलकावर लिहावेत. ते वाचून दाखवावेत व विद्यार्थ्यांनाही म्हणायला सांगावे. या पृष्ठावरील मजकूर वाचून ऐकवावा. विद्यार्थ्यांना सोबत म्हणायला सांगावे.

उपक्रम : जेवणाच्या चांगल्या सवयी, एकमेकांच्या जेवणातील पदार्थ यांवर गटात गप्पा मारण्यास सांगावे.

- पाहा. ऐका. म्हणा.




भात




भाजी




भाकरी



चटणी




मीठ




ताक




चमचा



चटई



माठ



ताट

- जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| मीठ | ताक |
| ताक | मीठ |
| ताट | माठ |
| चमचा | ताट |
| माठ | चमचा |

| | |
|---|---|
| भाकरी | भात |
| चटई | भाजी |
| भात | चटई |
| चटणी | भाकरी |
| भाजी | चटणी |

**शिक्षकांसाठी :** चित्र शब्दकार्ड वापरून एका दृष्टिक्षेपात शब्द वाचण्याचा सराव घ्यावा.

- पाहा. शब्द वाचा. समान अक्षरे शोधा. वाचा.

| ताक | भात | चटई | मीठ |
|---|---|---|---|
| ताट | भाजी | चमचा | माठ |
| ता | भाकरी | चटणी | ठ |
| | भा | च | |
| ता | भा | च | ठ |

- पाहा. समजून घ्या. वाचा.

| | | |
|---|---|---|
| भा | भ | ा |
| ता | त | ा |

| | | |
|---|---|---|
| च | ा | चा |
| ठ | ा | ठा |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| भ | भा | त | ता | च | चा | ठ | ठा |

- खालील अक्षरे जुळवा. शब्द, वाक्य बनवा.

अ आ ई
ग गा ब बा घ
घा ह हा य या
स सा म मा र
रा व वा

त
ता भ
भा च चा
ठ ठा

**जसे :** या. आत या. भरत, आत या.

शिक्षकांसाठी : वरील समान अक्षराने सुरुवात व शेवट होणाऱ्या शब्दांच्या गटातील सारखी अक्षरे ओळखण्यास व वाचण्यास सांगावे. 'ा' या चिन्हासह आलेली अक्षरे वाचून घ्यावीत. त्यातील 'ा' वगळून होणारी अक्षरे वाचण्यासाठी द्यावीत. (जसे – भा भ, ता त.) या व पूर्वीच्या पाठात आलेल्या इतर अक्षरांना 'ा' जोडून वाचण्याचा सराव घ्यावा.

● वाचा. लिहा.

चर - चार - चारा      भर - भार - भारा

वर - वार - वारा      तर - तार - तारा


---

● वाचा. लिहा.

या. भरभर या.      घरात या. बसा.      बसा. ताठ बसा.



---

● चित्रांची नावे लिहा.






हा........      ........वा      च........चा      ........सा







........घ      फु........      गा........      ........र


# १४. उघड्यावरचा खाऊ

• पाहा. बोला. ऐका. म्हणा.

पॉल, अंकिता, गौरी
फिरायला गेले बाहेरी.
उघडे खाऊन पोट दुखले,
औषध घेतले, दुखणे थांबले.
उघड्यावरचे खाल्ले नसते,
असे दुखणे आले नसते.










शिक्षकांसाठी : १. कविता तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावी. २. विद्यार्थ्यांकडून कविता तालासुरात, साभिनय म्हणण्याचा सराव घ्यावा. ३. चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. ४. चित्रांत कोणकोण काय करत आहेत ते विचारावे. चित्रांतील प्रसंगांबाबत गटात चर्चा करण्यास सांगावे. उघडे, शिळे, रस्त्यावरचे अन्नपदार्थ खाण्याबद्दल त्यांचे अनुभव, मत विचारावे. अंकिता, उघडे, खाऊन, औषध हे शब्द विचारावेत. ते फलकावर लिहून एकेक शब्द वाचून दाखवावा. तो शब्द पाहून म्हणायला सांगावे. अं, उ, ऊ, औ यांपैकी प्रत्येक अक्षरापासून सुरुवात होणारे शब्द विचारावेत. ते फलकावर लिहून त्यांचे वाचन करावे. मुलांना म्हणण्यास सांगावे. हे शब्द वापरून वाक्ये सांगण्याचा सराव घ्यावा. मुलांची वाक्ये फलकावर लिहावीत. वाचून दाखवावीत.

# १५. माझा शब्दसंग्रह–३

- पाहा. ऐका. म्हणा.


इमारत


इसाक


उषा



उदबत्ती


ऊस


ऊठ


एक


एडका


ऐरण


ऐक



अंगठी



औषध



षट्


ओढणी


ओठ


औत


अंगठा


षट्कोन

**शिक्षकांसाठी :** १. तीन–तीन विद्यार्थ्यांचे गट करावेत. प्रत्येक विद्यार्थ्यास या पृष्ठावरील एकेक शब्दपट्टी द्यावी. २. एका विद्यार्थ्याकडील शब्दपट्टी वर्गाला दाखवण्यास सांगावे. तो शब्द वाचून दाखवावा. याप्रमाणे सर्व शब्द, सर्व विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावेत. ३. गटातील विद्यार्थ्यांना त्यांच्याकडील शब्द एकमेकांना वाचून दाखवण्यास सांगावे. सारख्या अक्षराने सुरुवात व शेवट होणारे शब्द ज्यांच्याकडे आहेत, त्यांच्या जोड्या करण्यास सांगावे. प्रत्येक जोडीला सर्व विद्यार्थ्यांसमोर उभे करून त्यांच्याकडील शब्दपट्ट्या वर्गास दाखवून वाचण्यास सांगावे.

- जोड्या जुळवा.



| | |
|---|---|
| इसाक | ऐक |
| औषध | इसाक |
| ऐक | ऊठ |
| एक | औषध |
| ओढणी | उदबत्ती |
| षट् | एक |
| उदबत्ती | षट् |
| ऊठ | ओढणी |



| | |
|---|---|
| इमारत | उषा |
| उषा | इमारत |
| ऊस | एडका |
| एडका | षट्कोन |
| षट्कोन | ऊस |

| | |
|---|---|
| ऐरण | अंगठी |
| अंगठी | ओठ |
| ओठ | ऐरण |
| औत | अंगठा |
| अंगठा | औत |

● शब्द वाचा. सारखी अक्षरे ओळखा. वाचा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| इमारत | उदबत्ती | ऊस | एक | ऐरण |
| इसाक | उषा | ऊठ | एडका | ऐक |
| इ | उ | ऊ | ए | ऐ |

इ    उ    ऊ    ए    ऐ

● शब्द वाचा. सारखी अक्षरे ओळखा. वाचा.

| | | | |
|---|---|---|---|
| ओढणी | औषध | अंगण | षट् |
| ओठ | औत | अंगठी | षट्कोन |
| ओ | औ | अं | ष |



ओ    औ    अं    ष

● खालील शब्दांपासून वाक्ये बनवा.



बघ    बघा    या    बस    बसा

घर    ससा    अमर    आजोबा

ऊठ    राहा    उभा    ताठ

**जसे :** या. आजोबा या.

**शिक्षकांसाठी :** समान अक्षराने सुरुवात व शेवट होणारे शब्द व समान अक्षरे वाचण्याचा सराव घ्यावा. या पाठाच्या आधी झालेली अक्षरे व या पाठातील अक्षरे यांची कार्डे गटात देऊन ती जुळवून शब्द तयार करण्यास सांगावे. विद्यार्थ्यांनी तयार केलेले शब्द फलकावर लिहून, वाचून घ्यावेत. त्यांच्या शब्दपट्ट्या गटांत वाचण्यासाठी द्याव्यात. शब्दपट्ट्यांवरील शब्द पाहून लिहिण्यास सांगावे.

# १६. बाळाचे दोस्त

- ऐका. म्हणा.



एक चिऊ आली,
बाळाला पाहून गेली.

एक पोपट आला,
पेरू देऊन गेला.

एक खार आली,
बोर देऊन गेली.


एक पारवा आला,
चिकू देऊन गेला.

एक साळुंकी आली,
आवळा देऊन गेली.

एक कावळा आला,
बाळाभोवती नाचून गेला.

**शिक्षकांसाठी :** कोणकोणते पक्षी पाहिले, कोठे पाहिले, कोणता पक्षी आवडतो व का? असे प्रश्न विचारावे आणि गाणे तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावे. विद्यार्थ्यांनाही म्हणायला सांगावे. नंतर चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. त्यातील पक्ष्यांची नावे विचारावी. विद्यार्थ्यांनी सांगितलेली पक्ष्यांची नावे फलकावर लिहावी. ती वाचून दाखवावी. विद्यार्थ्यांना पाठोपाठ म्हणण्यास सांगावे. विद्यार्थ्यांकडून पक्ष्यांच्या आवाजांच्या नकला करून घ्याव्यात.


- ऐका. म्हणा. पाहा. बोला.



चिमणी



घार




मोर




कबुतर



कावळा



पोपट




बदक



कोंबडा

---

ही  आहे.

ही चिमणी आहे.

हा  आहे.


हा कावळा आहे.

---

- ऐका. म्हणा.

कावळा करतो, काव काव काव.
चिमणी करते, चिव चिव चिव.
कोकीळ बोले, कुहू कुहू कुहू.
कोंबडा आरवतो, कुकुचकू, कुकुचकू.






- जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| कोंबडा | कावळा |
| पोपट | कोंबडा |
| बदक | पोपट |
| कावळा | बदक |

| | | | |
|---|---|---|---|
| मोर | घार | चिमणी | कबुतर |

| | | | |
|---|---|---|---|
| कबुतर | चिमणी | घार | मोर |


- खालील शब्द वापरून वाक्ये बनवा.




आज मी

कावळा
मोर चिमणी
घार कबुतर कोंबडा
बदक पोपट

आहे.





जसे : आज मी मोर आहे.

# १७. झुईं झुईं झोका



* ऐका. म्हणा.

झुईं झुईं झोका
झाडावर टांगा,
झोक्यासाठी लावा
भराभरा रांगा.

वर खाली वर
झोका आला वेगा,
पोटामधि माझ्या
गुईं गुईं गुंगा.

उंच गेला झोका
दादा झाला ठेंगा,
ताईला वाकुल्या
डिंग डिंग डिंगा.

आई देते झोका
खेळ आला रंगा,
सुख मोठे कोठे
याच्याहुनि सांगा?

**– हेमंत मुसरीफ**

शिक्षकांसाठी : गाणे तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावे. विद्यार्थ्यांना पाठोपाठ म्हणायला सांगावे. नंतर चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्राचे वर्णन करण्यास सांगावे.

- **पाहा. बोला.**



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रातील खेळ, स्थळ, प्रसंग, संवाद यांविषयी मुलांना बोलते करावे. त्यासाठी खालील प्रश्नांसारखे प्रश्न विचारावेत.

**प्रश्न –** तुम्ही असे झोके पाहिले आहेत काय ? कोठे कोठे पाहिले ? यांपैकी तुम्ही कोणकोणत्या झोक्यावर बसला आहात ? केव्हा ? कोठे ? तुमचे याबाबतचे अनुभव सांगा. या चित्रातील मुले आपापसात काय बोलत असतील ? या चित्रातील झोक्यांशिवाय तुमच्या परिसरात कोणते वेगळे झोके असतात? त्यांची नावे सांगा, वर्णन करा. चित्रे काढा.

# १८. खेळ रंगला

- पाहा. बोला. म्हणा.



रविवार दिवस सुटीचा,
मिळून साऱ्यांनी खेळायचा.
कुणा आवडे लगोरी-लंगडी,
कुणी घालती सुंदर फुगडी.
यश, किशोर, समीर, पीटर,
मिळून खेळती क्रिकेट छान.
विटीदांडूही खेळून झाला,
चमू मुलांचा दमून गेला.







शिक्षकांसाठी : 'तुम्ही कोणकोणते खेळ खेळता? तुम्हांला कोणता खेळ आवडतो व का?' असे प्रश्न विचारून मुलांनी सांगितलेल्या खेळांची नावे फलकावर लिहावी. ती नावे वाचून दाखवावी. मुलांना म्हणायला सांगावी. नंतर चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रातील खेळांची नावे विचारावी. सोबतचा मजकूर लयीत ऐकवून विद्यार्थ्यांनाही म्हणायला सांगावे.

• पाहा. ऐका. म्हणा.



झोका



विटीदांडू



लगोरी



लंगडी



फुगडी

• शब्द-शब्द जोड्या जुळवा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| विटीदांडू | झोका | लगोरी | लंगडी | फुगडी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| झोका | विटीदांडू | फुगडी | लगोरी | लंगडी |

• ऐका. म्हणा.

फूऽ फूऽ फुगडी.
फुगडी बाई फुगडी.
कानात माझ्या बुगडी.
फुगडी खेळता जीव माझा रमला बाई.
सोड मैतरणे आता मला कामाची घाई.



# १९. खेळूया शब्दांशी


- **पाहा. बोला.**




**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना पुढील सूचना द्याव्यात. त्याप्रमाणे कृती करून घ्यावी. चित्राचे निरीक्षण करा. चित्राचे वर्णन करा. चित्राप्रमाणे कृती करा. १. माझ्याभोवती गोलाकार उभे राहा. २. माझ्या हातातील सूचनापट्टी पाहा. सूचना लक्षात ठेवा. कृती करा. (पुरेसा सराव.) ३. सूचनापट्टी वाचा. सूचनापट्टीवरील सूचना-पळा, थांबा, उड्या मारा, हसा, इत्यादी. ४. सूचनापट्टी वाचून गटात कृती करा.

# २०. चला सहलीला

- पाहा. बोला.




- पाहा. ऐका. म्हणा.




किल्ला



किनारा



बगळा



मीन

- जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| किनारा | किल्ला | मीन | बगळा |
| किल्ला | किनारा | बगळा | मीन |

शिक्षकांसाठी : विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रात काय काय दिसते ते विचारावे.

# २१. माझा शब्दसंग्रह–४

● शब्द वाचा. सारखी अक्षरे ओळखा. वाचा.

| |
|---|
| विमान |
| विटीदांडू |
| वि |

| |
|---|
| कावळा |
| बगळा |
| ळा |

| |
|---|
| फुगडी |
| लंगडी |
| डी |

| |
|---|
| मीन |
| विमान |
| न |

| |
|---|
| मीन |
| मीठ |
| मी |

| |
|---|
| किनारा |
| किल्ला |
| कि |

● वाचा.

वि  कि

न  डी

ळा  मी

शिक्षकांसाठी : गट केलेल्या शब्दपट्ट्यांचे निरीक्षण करण्यास सांगावे. शब्दपट्ट्यांवरील समान अक्षरे ओळखण्यास सांगावे. त्यांचे वाचन करून दाखवावे. याप्रमाणे पुरेसा सराव झाल्यावर प्रत्येक शब्दगटातील शेवटी किंवा सुरुवातीला आलेल्या समान अक्षरांची कार्डे देऊन त्यांपासून शब्द तयार करण्यास सांगावे. कि, डी, ळा, मी, न, वि या व पूर्वीच्या अक्षरांपासून तयार केलेल्या शब्दांचे वाचन घ्यावे.

- पाहा. ऐका. समजून घ्या. वाचा.

| | | | |
|---|---|---|---|
| वि व ि | व ि वि | व ा वा | न ा ना |
| डी ड ी | ड ि डि | म ा मा | क ा का |
| मी म ी | म ी मी | ळ ा ळा | ड ा डा |
| कि क ि | क ि कि | | |

- पाहा. ऐका. समजून घ्या. लिहा. वाचा.

| | | |
|---|---|---|
| स ि सि<br>स ी – | घ ि –<br>घ ी घी | न ि नि<br>न ी – |
| व ि –<br>व ी वी | र ि रि<br>र ी – | ड ि –<br>ड ी डी |
| ग ि गि<br>ग ी – | य ि यि<br>य ी – | म ि मि<br>म ी – |
| ब ि –<br>ब ी बी | ह ि –<br>ह ी ही | ळ ि –<br>ळ ी ळी |

शिक्षकांसाठी : सारणीतील अक्षरांना जोडलेली ‘ ि ’, ‘ ी ’ ही चिन्हे वेगळी करून व पुन्हा पूर्वीच्या अक्षरांना ‘ ि ’, ‘ ी ’ ही चिन्हे जोडून अक्षरे वाचून घ्यावीत. नव्याने परिचित झालेली व पूर्वीची अक्षरे यांपासून तयार झालेले शब्द व वाक्ये यांच्या वाचनाचा पुरेसा सराव घ्यावा.

- खालील अक्षरे जुळवून शब्द किंवा वाक्य बनवा.

ब सा ह वि गा ळा

मी डी न गि ळी का ही र आ

हे नि की मा वा वी



जसे : हवा.

हवा गार आहे.

---






- वाचा. लिहा.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कळ | → | कळा | → | काळ | → | काळा | → | कळी |
| वड | → | वडा | → | वाडा | → | वडी | → | वाडी |
| मळ | → | माळ | → | मळा | → | माळा | → | मळी |
| नळ | → | नळी | → | नीळ | → | निळा | → | निळी |

वीर-रवी     काम-मका     वार-रवा     वाडा-डावा

---

- चित्रांची नावे लिहा.

............... ............... ............... ............... ...............

............... ............... ............... ............... ...............


# २२. मी कोण ?

● ऐका. म्हणा. पाहा. बोला.

आवाज नाही, धूरही नाही
धावत जाई वेगाने ।
दोन चाके, भरभर चाले
वाटेवरच्या वळणाने ।।





पायवाट वा महामार्ग हा
गर्दीतुनही जाई पुढती ।
मध्ये भेटता मैतर कोणी
तेही बसतील, मागे-पुढती ।।



इंधन नाही, बंधन नाही
कोण बैसला ऐटीत वरती ।
सांगा पाहू, कोण मी
जरा चालवा हो मती ।।



शिक्षकांसाठी: कविता तालासुरात म्हणावी. विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावी.

- **पाहा. बोला.**




**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्रांत काय काय दिसते ते विचारावे. वाहनांच्या आवाजांच्या/चालण्याच्या नकला करायला सांगाव्यात. सोबतचे प्रश्न विचारावेत. • या चित्रातील कोणकोणती वाहने तुमच्या परिसरात आहेत? कोणती नाहीत? • या चित्रात नाहीत; पण तुमच्या परिसरात आहेत अशी वाहने कोणती? • तुम्ही कोणकोणत्या वाहनांतून प्रवास केला? त्याबाबतचे तुमचे अनुभव सांगा. • तुम्हांला कोणत्या वाहनातून प्रवास करायला आवडेल? का?





**उपक्रम :** शाळा सुटल्यानंतर किंवा सुटीच्या दिवशी मित्रांसोबत, पालकांसोबत/शिक्षकांसोबत रस्त्याच्या कडेला सुरक्षित ठिकाणी थांबा. जाणाऱ्या-येणाऱ्या वाहनांचे निरीक्षण करा. तुमचे निरीक्षण वर्गात सांगा. वाहनांच्या चित्रांचा संग्रह करा.

# २३. माझा शब्दसंग्रह-५




**शिक्षकांसाठी:** आपल्या वर्गात कोणकोणत्या वस्तू दिसतात, ते पाहण्यास सांगावे. त्या वस्तूंची नावे विचारावीत. त्यांनी सांगितलेली नावे फलकावर लिहावीत. ती वाचून दाखवावी. विद्यार्थ्यांना सोबत वाचायला सांगावे. नंतर या वस्तूंच्या नामपट्ट्या विद्यार्थ्यांकडे द्याव्या. विद्यार्थ्यांच्या हातातील नामपट्ट्या वाचून दाखवाव्या. नामपट्टी वाचल्यानंतर ती नामपट्टी त्या वस्तूजवळ ठेवण्यास सांगावे. नंतर चित्रातील कल्पफलकावरील चित्र-शब्दजोड्या पाहायला सांगावे. चित्राखालील शब्द वाचून दाखवावे. विद्यार्थ्यांना म्हणायला सांगावे.

- जोड्या लावा.

| | | |
|---|---|---|
| फुले |  | फुगे |
| फुगे |  | खडू |
| खडू |  | फुले |
| झाडू |  | फळा |
| फळा |  | झाडू |
| फरशी |  | छत्री |
| छत्री |   | छकुली |
| छकुली |  | फरशी |

शिक्षकांसाठी: शब्द-चित्र-शब्द यांच्या जोड्या जुळवण्याचा गटात सराव द्यावा.

- जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| फुले | फुगे | फरशी | फळा |
| फुगे | फुले | फळा | फरशी |
| खडू | झाडू | छकुली | छत्री |
| झाडू | खडू | छत्री | छकुली |

- शब्द वाचा. सारखी अक्षरे ओळखा. वाचा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| फुले | खडू | फळा | ढग | छत्री |
| फुगे | झाडू | फरशी | ढकलगाडी | छकुली |
| फु | डू | फ | ढ | छ |

फु डू फ ढ छ

* पाहा. ऐका. समजून घ्या. लिहा. वाचा.

| | |
|---|---|
| फु फ ु | डू ड ू |
| फ ू फू | ड ु डु |

| | |
|---|---|
| ढ ु ढु | ढ ू ढू |
| छ ु छु | छ ू छू |

---

| | | |
|---|---|---|
| क ु कु<br>क ू – | त ु –<br>त ू तू | ग ु गु<br>ग ू – |
| न ु –<br>न ू नू | घ ु घु<br>घ ू – | ब ु –<br>ब ू बू |
| च ु –<br>च ू चू | भ ु –<br>भ ू भू | म ु –<br>म ू मू |
| ठ ु ठु<br>ठ ू – | य ु यु<br>य ू – | र ु रु<br>र ू रू |
| व ु –<br>व ू – | ह ु –<br>ह ू – | ळ ु –<br>ळ ू – |

शिक्षकांसाठी : सारणीतील अक्षरांचे निरीक्षण करायला सांगावे. अक्षरांना जोडलेली ' ु ', ' ू ' ही चिन्हे वेगळी करून व पुन्हा जोडून त्यांचे उच्चार करून दाखवावे. नंतर अक्षरांना उकार जोडून अक्षरे वाचण्याचा सराव घ्यावा. (जसे : च-चु, च-चू.) नंतर पुढील पृष्ठावरील चौकटीतील अक्षरे शब्दांत शोधण्याचा व अक्षरांपासून तयार झालेल्या शब्दांचे व वाक्यांचे वाचन करण्याचा सराव घ्यावा.

- खालील अक्षरे जुळवून शब्द किंवा वाक्य बनवा.

वा उ ना मू घ ड च ठ डू
भू ग छ छा क ढ फु न फ
क अ त डा र व ता नि

जसे : वाच. रतन वाच.

---

- लिहा.


जसे : वाढ – वाढा

वाफ – ................  काढ – ................

- चित्रांची नावे पूर्ण करा.



मू..........




घु..........



..........ग



झा..........



का..........डी




क..........रापेटी

# २४. ऊठ मुला !

- पाहा. बोला. ऐका. म्हणा.



ऊठ मुला, ऊठ मुला,
बघ हा अरुणोदय झाला !

किलबिलती, बागडती,
झाडांवरती पक्षि किती !

फुलांवरी, फळांवरी,
पतंग मोदे मजा करी !

झटकन् बसे, चटकन् उठे,
उंच भराऱ्या घेत सुटे !

शीतल हा वात पहा,
आळस हरण्या, येत अहा !


पूर्वेला रवि आला,
मुला, उठाया कथित तुला !

– बालकवी

**शिक्षकांसाठी :** गाणे तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावे. विद्यार्थ्यांनाही म्हणायला सांगावे. चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. कवितेतील ओळी आणि चित्रे यांचे सहसंबंध ओळखून त्यावर विद्यार्थ्यांना बोलू द्यावे.


# २५. माझा शब्दसंग्रह-६

- पाहा. बोला.




**शिक्षकांसाठी :** चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रात काय काय दिसते ते विचारावे. चित्रात दिसणाऱ्या गोष्टी तुम्ही प्रत्यक्ष पाहिल्या आहेत का? कोठे पाहिल्या आहेत? यांसारखे प्रश्न विचारून त्यांना बोलते करावे. त्यांचे अनुभव कथन करायला सांगावे. चित्रातील गोष्टींचा एकमेकांशी काही संबंध आहे का? संबंध असेल तर तो कसा? असे प्रश्न विचारून मुलांना मुक्तपणे बोलायला प्रवृत्त करावे.

● **पाहा. बोला.**






**शिक्षकांसाठी :** परिसरात दिसणाऱ्या दुकानांच्या पाट्या तयार करून विद्यार्थ्यांना दाखवाव्यात. त्या वाचून दाखवाव्यात. परिसरातील दुकानांच्या पाट्यांचे निरीक्षण करायला सांगावे.


● पाहा. ऐका. म्हणा.


डोंगर



झाडे



पाऊस



धबधबा


धरण


पाणी


ऊस



बैलगाडी



ट्रॅक्टर


गुऱ्हाळ


गूळ


रसवंतिगृह




रस


कारखाना


साखर

---


● जोड्या जुळवा.


| | | |
|---|---|---|
| पाऊस |  | धरण |
| धबधबा |  | पाऊस |
| धरण |  | धबधबा |

---

शिक्षकांसाठी : चित्र-शब्दजोड्यांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्राखालील शब्द वाचून दाखवावेत. विद्यार्थ्यांना म्हणण्यास सांगावे. त्यानंतर शब्द-चित्र-शब्दजोड्या जुळवण्याचा सराव घ्यावा. गटात शब्दपट्ट्या देऊन त्यांच्या जोड्या जुळवण्यास सांगावे.

● पाहा. ओळखा.








**शिक्षकांसाठी :** चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रांत काय काय दिसते ते विचारावे. पहिल्या व दुसऱ्या गटांतील चित्रे दाखवून जमिनीच्या खाली काय आणि जमिनीच्या वर काय ते ओळखायला सांगावे.


**उपक्रम :** जमिनीच्या खाली आणि जमिनीच्या वर येणाऱ्या पिकांची नावे माहीत करून घ्या. त्यांची चित्रे जमवा. ती चिकटवहीत चिकटवा. पुढील वस्तूंपासून तुमच्या घरी कोणकोणते पदार्थ तयार केले जातात, याविषयी आपापसात गप्पा मारण्यास सांगावे. वस्तू : गाजर, बटाटा, टमाटा, साखर, गूळ, उडीद.

● पाहा. ऐका. म्हणा.



लसूण



कांदा



मुळा



हळद


बटाटा


गाजर


उडीद


मिरची


टमाटा


ऊस

● जोड्या लावा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ऊस | हळद | टमाटा | बटाटा | उडीद |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| हळद | ऊस | बटाटा | उडीद | टमाटा |

● शब्द वाचा. सारखे अक्षर ओळखा. वाचा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पाऊस | उडीद | धरण | बटाटा | धरण |
| पाणी | हळद | लसूण | टमाटा | धबधबा |
| पा | द | ण | टा | ध |

पा द ण टा ध

● पाहा. ऐका. समजून घ्या. म्हणा.

| | |
|---|---|
| पा | प |
| द | दा |
| ण | णा |
| टा | ट |
| ध | धा |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प | पा | पि | पी | पु | पू |
| द | दा | दि | दी | दु | दू |
| ण | णा | णि | णी | णु | णू |
| ट | टा | टि | टी | टु | टू |
| ध | धा | धि | धी | धु | धू |

● वाचा.

| | | |
|---|---|---|
| दूध | धीट | गुण |

पी.

दूध पी.

रीटा, दूध पी.

दादा, दूध पी.



आण.

पाणी आण.

दीपक, पाणी आण.

दीपा, पाणी पी.



वीणा धीट आहे.

● वाचा. समजून घ्या. लिहा.

वाट – वाटा      आण – आणा      पार – पारा

● पाहा. ऐका. म्हणा.

**रसवंतिगृह**
येथे उसाचा ताजा रस मिळेल.

**सहकारी साखर कारखाना**

**भाजी मंडई**

● वाचा. लिहा.

दादा, आपण फुगा आणू.

फुगा उडवू. मजा करू.


शिक्षकांसाठी : स्वरचिन्हे जोडून सारणीत दिलेली अक्षरे वाचून दाखवावी. मुलांना म्हणण्यास सांगावी. या पृष्ठावरील शब्द व वाक्ये वाचण्याचा सराव घ्यावा. अक्षरांची कार्डे विद्यार्थ्यांकडे द्यावी व ती अक्षरकार्डे जुळवून नवीन शब्द तयार करण्याचा सराव घ्यावा.

# २६. पीक येई भरदार

- **पाहा. ऐका. म्हणा. बोला.**

ऊन असो, वारा असो
पाऊस पडो मुसळधार;
शेतकरी शेतात राबे,
पीक येई भरदार.


पीक हाले पीक डोले,
गंध जाई वाऱ्यावर;
गाई-गुरे नाचत जाती,
मुले गाती तालावर.



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रातील तपशिलावर बोलण्यास सांगावे. नंतर गाणे तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावे. विद्यार्थ्यांना तालासुरात, साभिनय म्हणायला सांगावे.

# २७. माझा शब्दसंग्रह–७


- पाहा. बोला.



**शिक्षकांसाठी :** चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रांत काय काय दिसते ते विचारावे. चित्रांतील गोष्टी कोठे पाहिल्या, त्याबद्दल त्यांचे अनुभव काय आहेत, ते विचारावे.


● पाहा. ऐका. म्हणा.


खार



खाट



बैल


चूल


बैलगाडी






शेत


झोका


शेळी


झोपडी

● जोड्या जुळवा.

| | | |
|---|---|---|
| खार |  | खाट |
| खाट |  | चूल |
| चूल |  | बैलगाडी |
| बैलगाडी |  | खार |
| शेत |  | झोपडी |
| झोका |  | शेळी |
| शेळी |  | झोका |
| झोपडी |  | शेत |

- पाहा. ऐका. म्हणा. सारखे अक्षर ओळखा. वाचा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| बैल | खार | झोका | शेळी | बैल |
| चूल | खाट | झोपडी | शेत | बैलगाडी |
| ल | खा | झो | शे | बै |

ल  खा  झो  शे  बै

- पाहा. ऐका. समजून घ्या. वाचा.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शे | श | े | बै | ब | ै | झो | झ | ो |

- पाहा. ऐका. फरक समजून घ्या.

| | |
|---|---|
| खा | ख |
| झो | झ |
| बै | ब |
| लै | ल |
| शे | श |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ख | खा | खि | खी | खु | खू | खे | खै | खो |
| झ | झा | झि | झी | झु | झू | झे | झै | झो |
| ब | बा | बि | बी | बु | बू | बे | बै | बो |
| ल | ला | लि | ली | लु | लू | ले | लै | लो |
| श | शा | शि | शी | शु | शू | शे | शै | शो |

- वरील अक्षरांपासून शब्द बनवा.

- वाचा. लिहा.

पालखी  झबले  शेगडी  झोप  झाड

शिक्षकांसाठी : या पृष्ठावरील शब्दगटांतील शब्दांचे निरीक्षण करायला सांगावे. शब्दांतील सारख्या दिसणाऱ्या अक्षरांकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधावे. त्या अक्षरांचा वाचनसराव घ्यावा. स्वरचिन्हे जोडून वर सारणीत दिलेली अक्षरे वाचून दाखवावी. विद्यार्थ्यांना म्हणण्यास सांगावी. 'े', 'ै', 'ो' या चिन्हांसह आलेली अक्षरे वाचून दाखवावीत. ही चिन्हे वगळून अक्षरे वाचायला सांगावीत. मूळ अक्षरे आणि त्याला चिन्हे जोडून तयार झालेली अक्षरे यांतील फरक स्पष्ट करावा. तसेच त्या शब्दांचे वाचन करण्याचा सराव घ्यावा.

● वाचा. लिहा.




● रिकाम्या जागी योग्य शब्द वापरा. वाक्य सांगा. लिहा.

| | |
|---|---|
| ………………… खा. | ………………… दे. |
| ………………… आण. | ………………… घे. |
| ………………… ऊठ. | ………………… बस. |
| ………………… बघ. | ………………… धर. |
| ………………… आला. | ………………… आली. |

# २८. माझा शब्दसंग्रह–८

- पाहा. ऐका. म्हणा.

चंदन, चंपा यांनी फुले आणली.
गौतम, गौरी यांनी हार बनवले.
एकनाथ, काशीनाथ यांनी गुच्छ बनवले.
पाहुणे आले. फोटोला हार घातला.
मुलांनी पाहुण्यांना गुच्छ दिले.





- पाहा. बोला.



गौतम




गौरी



चंदन



चंपा




एकनाथ



काशीनाथ



जाई



जास्वंद

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना माहीत असलेली फुलांची नावे विचारावीत. फुलांचे उपयोग विचारावेत. या पृष्ठावरील फुलांची नावे विचारावीत. चित्राचे वर्णन करायला सांगावे. चित्रातील मुले आपापसात काय बोलत असतील ते विचारावे. विद्यार्थ्यांनी सांगितलेली फुलांची, मुलांची नावे फलकावर लिहावीत. ती वाचून दाखवावीत. मुलांकडून म्हणून घ्यावीत. या पृष्ठावरील मजकुरातील एकेक वाक्य वाचावे. विद्यार्थ्यांना म्हणायला सांगावे.

**उपक्रम :** विविध आकारांच्या पानांचा संग्रह करणे, झाडाखाली पडलेली पाने सुकवून वहीत चिकटवणे.

- शब्द वाचा. सारखी अक्षरे दाखवा. वाचा.

| | | | |
|---|---|---|---|
| जाई | गौतम | चंदन | एकनाथ |
| जास्वंद | गौरी | चंपा | काशीनाथ |
| जा | गौ | चं | थ |


जा  गौ  चं  थ

- वाचा.

जा = ज + ा    गौ = ग + ौ    चं = च + ं


| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ज | जा | जि | जी | जु | जू | जे | जै | जो | जौ | जं |
| थ | था | थि | थी | थु | थू | थे | थै | थो | थौ | थं |
| ग | गा | गि | गी | गु | गू | गे | गै | गो | गौ | गं |






**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना समान अक्षराने सुरुवात व शेवट होणारे शब्द वाचण्यास सांगावे. त्यांतील सारखे अक्षर ओळखून वाचण्यास सांगावे. अक्षरकार्डे जुळवून तयार केलेले दुसऱ्या गटातील शब्द वाचण्यास सांगावे.

- वाचा. अधोरेखित अक्षरांवर अनुस्वार द्या. वाचा.



मी पाडुरग धाडे.
हा माझा बगला.
समोर अगण आहे.
अगणात सुदर बाग आहे.
बागेभोवती भित आहे.
बागेत विविध रगांची
फुले आहेत.
मागे उच डोगर आहे.

- म्हणा.







गाढव म्हणाले जिराफाला,
''का हो तुमची लांब मान ?''

जिराफ म्हणाले,
''आधी सांगा, का हो तुमचे लांब कान ?''

– मंगेश पाडगावकर


# २९. ओळखा पाहू


- पाहा. ओळखा. नावे सांगा. नावे दाखवा.









| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | क | लिं | ग | ड |
| | | | | | | र | | | |
| | | | | | | वं | | | |
| | | स | फ | र | चं | द | | | |
| | | | ण | | | | | | |
| अ | न | न | स | | | | | | |


- पाहा. ओळखा. नावे पूर्ण करा.



सी..............



........कू



.......ळिं.......


........रू


के........


..........र


..........बा



जां.............

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना पुढील प्रश्न विचारावेत. आपल्या परिसरात कोणकोणती फळझाडे आहेत? आपला परिसर कोणत्या फळांच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे? कोणकोणती फळे बाहेरगावाहून आपल्या गावात आणली जातात? तुम्ही कोणकोणती फळे पाहिली आहेत? तुम्ही कोणकोणती फळे खाल्ली आहेत? तुम्ही खाल्लेल्या प्रत्येक फळाची चव सांगा. या पृष्ठावर दिलेल्या फळांची चित्रे पाहा. त्यांची नावे सांगा. सारणीत त्यांची नावे लपलेली आहेत ती शोधा. दाखवा. नावे पूर्ण करा.

**उपक्रम :** फळांची चित्रे जमवा. त्यांची नावे लिहा. तुम्ही जमवलेल्या फळांच्या चित्रांचे वर्गात प्रदर्शन भरवा व फळांबद्दल गप्पा मारा.


# ३०. कोठे, काय ?

- **पाहा. ओळखा. कोणकोणती कामे आहेत ते सांगा.**


















**शिक्षकांसाठी :** १. विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रांत कोणकोणती कामे (व्यवसाय) दाखवली आहेत, ते विचारावे. विद्यार्थ्यांना ओळखता न आलेल्या व्यवसायाची माहिती सांगावी. नंतर पुढील प्रश्न विचारावेत. वरीलपैकी कोणकोणते व्यवसाय तुमच्या गावात/शहरात चालतात? वरीलपैकी कोणकोणते व्यवसाय तुमच्या गावापासून/शहरापासून जवळ आहेत? तुमच्या गावात/शहरात चालतात, पण या चित्रात नाहीत असे व्यवसाय कोणते? तुम्ही कोणकोणत्या व्यवसाय स्थळांना भेटी दिल्या? २. विद्यार्थ्यांनी परिसर भेटीचे अनुभव वर्गात सांगितल्यानंतर त्यावर आधारित अनुभव तक्ते तयार करावेत. ते वाचून दाखवावेत. विद्यार्थ्यांना म्हणण्यास सांगावे.


**उपक्रम :** गुरुजी, मित्र, नातेवाईक यांपैकी कोणालातरी सोबत घेऊन व्यवसायाच्या ठिकाणी/तसेच तुमच्या परिसरातील प्रसिद्ध ठिकाणी भेट द्या. प्रश्न विचारून माहिती मिळवा. तुमचे अनुभव वर्गात सांगा.


# ३१. माझा शब्दसंग्रह-९


- पाहा. ऐका. म्हणा.


रिक्षा


नक्षी


पक्षी


ऋचा


वृक्ष


प्रज्ञा

ऋ क्ष ज्ञ


---

- ऐका. म्हणा.






ही माझी ताई.
तिचे नाव ऋचा.
ती काढते सुंदर नक्षी.
नक्षीत तिच्या छान पक्षी.

पीटर माझा वर्गमित्र.
फळ्यावर काढतो सुंदर चित्र.
अक्षर त्याचे वळणदार.
पाटीवर दिसते उठावदार.





**शिक्षकांसाठी :** क्ष, ज्ञ, ऋ ही अक्षरे असलेले शब्द विद्यार्थ्यांना विचारावेत. ते फलकावर लिहावेत. वाचून दाखवावेत. विद्यार्थ्यांना म्हणायला सांगावे. शिक्षकांनी स्वत: असे काही शब्द सांगावेत. या शब्दांच्या पट्ट्या तयार करून विद्यार्थ्यांकडे गटात द्याव्यात. त्यांवरील शब्द गटात वाचण्याचा सराव घ्यावा. ज्या शब्दांची सुरुवात किंवा शेवट 'क्ष'ने होतो, त्या शब्दपट्ट्या असलेल्या मुलांचा गट वेगळा करावा. त्यावरील शब्द वाचण्याचा सराव घ्यावा. याप्रमाणे ज्ञ, ऋ ही अक्षरे असलेल्या शब्दपट्ट्या वाचण्याचा सराव घ्यावा. त्या शब्दपट्ट्या कल्प-फलकावर लावाव्यात. विद्यार्थ्यांना वाचनसराव होण्यासाठी त्या किमान महिनाभर प्रदर्शित कराव्यात. या पृष्ठावरील वाक्ये वाचून दाखवावीत. विद्यार्थ्यांना म्हणण्यास सांगावीत. विद्यार्थ्यांचे लक्ष जोडाक्षरयुक्त शब्दांकडे वेधावे. त्या शब्दांचे अचूक उच्चारण व अनुलेखन करून घ्यावे.

- पाहा. चित्रातील प्राणी ओळखा. त्यांची नावे सांगा. चौकटीत त्यांची नावे शोधा. दाखवा.

| | | | |
|---|---|---|---|
| धा | पा | अ | गां |
| म | ल | ज | डू |
| ण | ना | ग | ळ |
| ह | स | र | डा |


- ऐका. म्हणा. वाचा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **सर्व** | **सम्राट** | **पत्र** | **वर्ग** | **ट्रक** |
| **मित्र** | **शेतकऱ्याला** | **वाऱ्यावर** | **क्रमांक** | **राष्ट्र** |

| 'र' ची रूपे | 'र' ची जोडाक्षरे | 'र'च्या जोडाक्षरांचे शब्द |
|---|---|---|
| र्‍ (reph) | | |
| ्र | | |
| ‿ | | |
| ^ | | |

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थी जोडाक्षरयुक्त शब्दांचे उच्चार अचूक करतात का, तसेच 'र'च्या जोडाक्षरांचे शब्द सारणीत अचूक लिहितात का, याकडे लक्ष द्यावे. विद्यार्थ्यांनी सांगितलेले 'र'च्या जोडाक्षरांचे शब्द फलकावर लिहावेत. ते शब्द विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावेत. वरील उताऱ्यातील मजकूर वाचून ऐकवावा. 'र'ची विविध रूपे असलेले शब्द शोधायला लावून ते शब्द व 'र'ची जोडाक्षरे सारणीत लिहायला सांगावी.

# ३२. मुळाक्षरे

अ आ इ ई उ ऊ ऋ

ए ऐ ओ औ अं अः

क ख ग घ ङ

च छ ज झ ञ

ट ठ ड ढ ण

त थ द ध न

प फ ब भ म

य र ल व

श ष स ह ळ

क्ष ज्ञ

**शिक्षकांसाठी :** मुळाक्षरांचे वाचन करून घ्यावे. विद्यार्थ्यांना म्हणायला सांगावे.

# ३३. नवा खेळ

परिपाठ झाला. आम्ही वर्गात गेलो. वर्गात आज नव्या बाई आल्या. त्यांनी सर्वांची ओळख करून घेतली. एक नवा खेळ घेतला. आम्हांला तो खेळ खूप आवडला. मी घरी आईबरोबर खेळ खेळलो. तुम्हांला आवडतो का तो खेळ बघा.

कोणताही सहा अक्षरांपर्यंतचा शब्द घ्यायचा. त्यात लपलेले शब्द शोधायचे. बाईंनी 'साखरवाडी' हा शब्द दिला होता. हा शब्द घ्या – खेळा या शब्दाशी.

१. वाचा. सांगा.


'साखरवाडी' या शब्दात खालीलपैकी कोणता शब्द नाही ?

१. साखर २. सार ३. वडी ४. साडी ५. खडी

२. खालील शब्दांत लपलेले शब्द शोधा.

अहमदनगर, नवरंगपूर, नागपूर.









३. उपक्रम : **कोणतेही चार-पाच-सहा अक्षरी शब्द घ्या. प्रत्येक शब्दात लपलेले शब्द गटात शोधा.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांनी सांगितलेले शब्द फलकावर लिहावेत. सर्वांकडून ते वाचून घ्यावे.

# ३४. माझे घर



- वरील चित्रातील घरासंबंधीचे शब्द लिहा.

जसे : खिडकी _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

- तुमच्या घरासंबंधीचे शब्द लिहा.

_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _


उपक्रम : तुमच्या घराची माहिती सांगा. घराप्रमाणे कुटुंब, आई, बाबा, शाळा, मित्र यांच्याशी संबंधित शब्द लिहा. माहिती सांगा.

# ३५. आपले सण-उत्सव

- चित्र पाहा. वर्णन करा.









आदिवासी होळी नृत्य

- चित्रांतील सणांसंबंधी तुमच्या आठवणी सांगा.
- तुमच्या घरी, गावात कोणकोणते सण, उत्सव साजरे होतात, ते कसे साजरे होतात ते सांगा.

# ३६. रमिलाची सावली

- वाचा.



रमिला सकाळी शाळेत निघाली.
चालता चालता तिने मागे पाहिले.
तिच्या मागे सावली होती.

रमिला दुपारी घराकडे निघाली.
तिने मागे पाहिले.
पुढे पाहिले.
सावली नव्हतीच कोठे !

रमिला सायंकाळी खेळायला निघाली.
तिच्यापुढे तिची सावली चालत होती.

रमिला विचार करू लागली.
'सावली मागे-पुढे होते तरी कशी आणि दुपारी जाते तरी कोठे ?'






**शिक्षकांसाठी :** शिक्षकांनी मुलांना स्वतःच्या सावलीचे निरीक्षण करण्यास सांगावे. रमिलाप्रमाणे तुमच्या मनात कोणते प्रश्न आले ते सांगा.

# ३७. कसे मिळेल पाणी ?


ऐका हो ऽऽ ऐकाऽऽ. आज संध्याकाळी जंगलचा राजा सिंह यांनी आपल्या जंगलात सभा बोलावली आहे. सर्वांनी या हो ऽऽ.


दुष्काळ पडला आहे. पाण्याची टंचाई आहे. सगळे पाण्यावाचून तडफडत आहेत. यावर काही उपाय सुचवा.
मला उपाय सुचला. आपल्या जंगलात पायऱ्यांचा जुना तलाव होता. तो आता बुजला आहे. तलावातून गाळ काढला, तर पाणी मिळेल.




**शिक्षकांसाठी :** खालील कृती विद्यार्थ्यांकडून करवून घ्याव्यात. १. एकेका चित्राचे निरीक्षण करणे. चित्रासंबंधी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे. २. चित्राचे निरीक्षण करणे व चित्राशेजारील मजकूर वाचणे. तो चित्राशी जुळवून पाहणे. ३. सर्व मजकूर सलग वाचणे. ४. कथा सांगणे. ५. नाट्यीकरणात भाग घेणे. ६. शिक्षकांनी सांगितलेली कथा ऐकणे. ७. गटात चर्चा करणे – स्वतःच्या गावातील पाण्याची समस्या व त्यावरील उपाययोजना. ८. गटकार्याचे सादरीकरण करणे. या क्रमाने विद्यार्थ्यांकडून कृती करून घ्याव्यात.

# ३८. आपले बापूजी

हे आपले बापूजी. यांचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी. आपण त्यांना 'राष्ट्रपिता', 'महात्मा' म्हणतो. त्यांची राहणी साधी. पोशाख साधा. खादीचे आखूड धोतर. पायात वहाणा. हातात काठी. डोळ्यांवर गोल चश्मा. कमरेला गोल घड्याळ.

गांधीजी आश्रमात राहत. पहाटे लवकर उठत. स्वतःचे काम स्वतः करत. ते चरख्यावर सूत कातत. गांधीजींना मुले खूप आवडत. गांधीजी मुलांबरोबर खेळत.

गांधीजींनी आश्रमात शाळा काढली होती. तेथे वाचणे-लिहिणे शिकवले जाई. तसेच जीवनासाठी उपयोगी शिक्षण दिले जाई. गांधीजींनी त्याला 'नई तालीम' असे नाव दिले होते.

मुले प्रेमाने गांधीजींना 'बापू' म्हणत. असे होते आपले बापूजी.



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रासंबंधी बोलण्यास सांगावे. पाठाचे प्रकट वाचन करावे. विद्यार्थ्यांकडून पाठाचे वाचन करून घ्यावे.

# ३९. फुलसिंग आणि इवलेसे रोप



फुलसिंगने आंबा खाल्ला. आंब्याची कोय त्याने मातीत फेकली. पावसाळा आला. भरपूर पाऊस झाला. शेत-शिवार हिरवेगार झाले. मातीत फेकलेल्या आंब्याच्या कोईला कोंब फुटला. पुढे काही दिवसांनी कोंबाचे रोप झाले. इवल्याशा रोपाला कोवळी कोवळी पाने फुटली.




एकदा फुलसिंग फिरत फिरत निघाला होता. त्या चिमुकल्या रोपाने फुलसिंगला गोड आवाजात हाक मारली. ''फुलसिंग ! ए फुलसिंग !'' फुलसिंगने कान टवकारले, समोर पाहिले, इकडे तिकडे पाहिले. त्याला इवल्याशा रोपामधून आवाज आल्यासारखे वाटले, म्हणून त्याने रोपाकडे पाहिले. इवलेसे रोप फुलसिंगकडे बघून हसले. फुलसिंग जवळ गेला.

**फुलसिंग** : कोण आहेस रे तू ? मला हाक का मारलीस ?

**रोप** : तू मला विसरलास ? तू आंबा खाऊन कोय मातीत फेकून दिली होतीस. त्या कोईतूनच माझा जन्म झाला.


फुलसिंगला खूप आनंद झाला. फुलसिंगने पालवी फुटलेल्या कोवळ्या रोपाला कुरवाळले, तेव्हा इवलेसे रोप पुन्हा गोड हसले आणि हसत हसत म्हणाले –



**रोप** : शेळ्या-मेंढ्यांपासून तू माझे संरक्षण करशील ? मला वेळच्या वेळी पाणी देशील ? माझी काळजी घेशील ? जर तू माझी काळजी घेतलीस, तर मी मोठा झाल्यावर तुला भरपूर आंबे देईन. गारगार सावली देईन.

फुलसिंग रोपाचे बोलणे ऐकून भारावला.

**फुलसिंग** : मित्रा, मी तुझी काळजी घेईन, तुला पाणी घालीन. तू मोठा होशील, मीही मोठा होईन आणि तुझ्या सावलीत माझ्या मित्रांना घेऊन खेळायला येईन. तुझी-माझी मैत्री पक्की होईल.



रोपाचे बोलणे आईला सांगायला तो घाईघाईने घरी निघाला.

- वाचा. लिहा.


| खाल्ला | आंब्याची | इवल्याशा | जन्म | मैत्री |
|---|---|---|---|---|
| .......... | ............. | ............. | ............. | ............. |
| .......... | ............. | ............. | ............. | ............. |

**शिक्षकांसाठी**: १. विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांबद्दल बोलायला सांगावे. २. पाठात आलेले जोडाक्षरयुक्त शब्द फलकावर लिहून दाखवावेत. त्यांतील जोडाक्षरांकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधावे. जोडाक्षरांची फोड करून दाखवावी. आणखी त्यासारख्या शब्दांचा सराव घ्यावा.


**उपक्रम** : १. फुलसिंग आणि रोप यांच्यातील संवादाचे विद्यार्थ्यांकडून सादरीकरण करून घ्यावे. २. विद्यार्थ्यांना कुंडीत बी लावायला सांगावे. रोप उगवल्यावर त्याची निगा राखण्यास सांगावे.

# ४०. गोष्ट एका घोड्याची

एक होता सदू. त्याच्याकडे एक गाढव आणि एक घोडा होता. तो गावोगावी जाऊन माल विकायचा.



एकदा सदू माल विकायला निघाला. त्याने दोघांच्या पाठीवर माल ठेवला. घोडा, गाढव पुढे निघाले. सदू मागून निघाला.



रस्त्यात ठेच लागून गाढव पडले. धडपडत उठले. हळूहळू घोड्यामागे चालू लागले. ते घोड्याला म्हणाले....

**गाढव** : अरे घोडेभाऊ, थांब जरा. माझं म्हणणं ऐक.


**घोडा** : काय ?

**गाढव** : तू माझ्या पाठीवरचं थोडं ओझं घे, म्हणजे मला नीट चालता येईल.

**घोडा** : मी का घेऊ तुझं ओझं ?



घोड्याने गाढवाकडे दुर्लक्ष केले व तो चालू लागला. गाढव हळूहळू चालू लागले. दमून गेले. खाली बसले. मागून त्याचा मालक सदू आला.



सदूने गाढवाच्या पाठीवरील सगळे ओझे काढले. गाढव धडपडत उठले. सदूने गाढवाच्या पाठीवरचे ते ओझे घोड्याच्या पाठीवर ठेवले.

आता घोडा-गाढव हळूहळू चालू लागले. ओझ्याने घोडाही दमून गेला. घोड्याने गाढवाचे म्हणणे आधीच ऐकले असते तर.....

- वाचा. लिहा.

| गोष्ट | घोड्याची | त्याच्या | रस्त्यात | दुर्लक्ष |
|---|---|---|---|---|
| .......... | ............. | ............. | ............. | ............. |
| .......... | ............. | ............. | ............. | ............. |

शिक्षकांसाठी: १. विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे व पुढील प्रश्न विचारावेत. (अ) प्रत्येक चित्रात काय काय दिसते ? (आ) सदू कोठे निघाला होता ? (इ) सदूकडे कोणते दोन प्राणी होते ? (ई) सदू प्राण्यांचा कशासाठी उपयोग करायचा ? (उ) गाढव का पडले ? (ऊ) पडल्यावर गाढव घोड्याला काय म्हणाले ? (ए) घोडा गाढवाला काय म्हणाला ? (ऐ) सदूने गाढवाच्या पाठीवरचे सगळे ओझे घोड्याच्या पाठीवर का ठेवले ?
२. पाठातील जोडाक्षरयुक्त शब्द फलकावर लिहून दाखवावेत. त्यातील जोडाक्षरांकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधावे. जोडाक्षरांची फोड करून दाखवावी. आणखी त्यांसारख्या शब्दांचा सराव घ्यावा.

# ४१. झाली सकाळ...





झाली सकाळ सरली रात,
चला घासूया आपले दात.

घर झाडून केर काढायचा,
टोपलीत सारा गोळा करायचा.






मोठाली नखे ठेवूच नका,
केस नीटनेटके कापा.

नखे वाढता माती भरते,
पोटात शिरता कुरकुर करते.



गारगार पाणी बादली भरून,
हसत घ्यायची अंघोळ करून.

चांगले धुतले कपडे घातले,
मन आनंदी होईल आपले.

– विठ्ठल वाघ



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| घ्यायची | घ्या | घ्य | ा | घ् | य | घ्य |

**शिक्षकांसाठी :** १. कविता तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावी. विद्यार्थ्यांना म्हणण्यास सांगावी. कविता तालासुरात, साभिनय म्हणण्याचा समूहात, गटात, वैयक्तिक सराव घ्यावा. २. विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे. चित्राचे वर्णन करायला सांगावे. ३. कवितेचे लयीत वाचन करवून घ्यावे. गटात वाचनाचा सराव घ्यावा. ४. जोडाक्षरयुक्त शब्द फलकावर लिहून, वाचून दाखवावा. त्यातील जोडाक्षरांकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधावे. जोडाक्षरांची फोड करून दाखवावी. ५. कविता वाचून प्रश्नांची उत्तरे गटात बसून सांगण्यास, लिहिण्यास, एकमेकांशी चर्चा करण्यास सांगावे.

# स्वाध्याय

- कविता तालासुरात म्हणा.

- **सांगा.**

१. नखे वाढल्याने काय होते?
२. तुमच्या घरातील स्वच्छतेची साधने सांगा.
३. तुमच्या घरातील केर-कचरा कोठे टाकला जातो?
४. घरातील केर-कचरा घराबाहेर टाकताना कोणती काळजी घ्यावी?

- **वाचा.**

आपले दात घासूया.
आपले घर झाडूया.
आपले कपडे धुऊया.

- **वाचा. लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| पोट - पोटात | ..........................<br>.......................... | नख - नखात | ..........................<br>.......................... |
| मन - मनात | ..........................<br>.......................... | बादली-बादलीत | ..........................<br>.......................... |
| कान - कानात | ..........................<br>.......................... | घर-घरात | ..........................<br>.......................... |

- **काय कराल ते सांगा.**

१. घरात केर झाल्यावर -
२. केर काढल्यावर -
३. नखे वाढल्यावर -

# ४२. माझी ओळख

माझे नाव ........................................................................................ आहे.

मी ....................................................... या इयत्तेत शिकतो./ शिकते.

माझ्या शाळेचे नाव ............................................................................ आहे.

माझे घर ........................................................................... गावात आहे.

माझ्या घरात ........................................................................... हे राहतात.

...................., .................... हे माझे मित्र ...................., ............... ह्या

माझ्या मैत्रिणी आहेत.

मला ................................., ..................................... करायला आवडते.

मला ............................................................................ आवडत नाही.

## माझा दिनक्रम

शाळेच्या दिवशी ..............................................................................


..............................................................................................................

सुट्टीच्या दिवशी ..............................................................................

..............................................................................................................

शिक्षकांसाठी : विद्यार्थ्यांना मजकूर वाचण्यास सांगावे. स्वत: सर्व विद्यार्थ्यांची पृष्ठे वाचावीत. वैशिष्ट्यपूर्ण बाबींचा उपयोग वर्णनात्मक नोंदीसाठी करावा.

CYAN MAGENTA YELLOW BLACK



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

₹ ३३.००